कोर्ट विद्यमान श्री. गौतम शंभरकर, नायब तहसिलदार, कामठी
(कोराडी मंडळ) यांचे कार्यालय, कामठी

रा.मा.क्रं.१० /आर.टी.एस.६४/२०१५ - १६
मौजा कोराडी प.ह.न. १४ ता.कामठी

आदेश

(पारित दि. २७ जुन २०१६)

अर्जदार में. मॉटीफकॉस ईफ्रां बिल्ड तर्फे श्रीहरी श्रीराम आदमने रा. ३७, कादंगीनी विहार बेसा, नागपूर जि. नागपुर यांनी मौजा कोराडी तलाठी साझा क्रमांक १४ येथील कोराडी औष्णीक प्रकल्पामध्ये संपादन झालेल्या जमिनीचे (घराचे) मोबदल्यात शासना कडुन पुनर्वसन करण्यात आले त्यामधील नामे श्री. नामदेव सदु सोनवने यांना प्राप्त भुखंड क्रमांक ए – १०, क्षेत्रफळ ७२० चौरस मिटर या भुखंडाचा फेरफार घेऊन तलाठी कार्यालयातील "अ" "ब" रजिस्टर वर नोंद घेण्याबाबत अर्जदार यांनी दिनांक २२.०६.२०१६ रोजी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे. प्राप्त अर्जासोबत मा. जिल्हाधिकरी नागपुर यांनी दिनांक १५.०६.२०१६ रोजी पारीत केलेल्या पुनर्वसन मधिल भुखंड विकण्याबाबतची परवाणगी आदेश, उक्त भुखंडाचा ड्युप्लीकेट पट्टा, तसेच सदर भुखंडाचे विक्रीपत्र व आधार कार्ड अर्जासोबत सादर केलेले आहे.

यावरुन प्रकरण नोंदविण्यात आले प्रकरण नोंदवुन तलाठी साझा क्रंमांक १४ मौजा कोराडी यांचे कडुन सद्य स्थितीचा मौका चौकशी अहवाल मागविण्यात आला. प्रकरणात तलाठी साझा क्रं. १४ मौजा कोराडी यांचेकडुन अहवाल प्राप्त. तलाठी यांचे अहवालाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, भुखंड क्रं. ए – १०, क्षेत्रफळ ७२० चौरस मिटर हा भुखंड अ,ब, रजिस्टर प्रमाणे नामे श्री. नामदेव सदु सोनवने यांचे नावाने आवंटीत आहे. तसेच सद्य स्थितीत उक्त भुखंड मौक्यावर खाली असल्याचे अहवाला वरुन दिसुन येते.

सदर प्रक्रणात अर्जदार यांना दिनांक २२.०६.२०१६ रोजी नोटीस काढुन दिनांक २४.०६.२०१६ रोजी हजर राहण्याबाबत तसेच लेखी म्हणने सादर करण्याबाबत कळविण्यात आले. त्याअनुषंगाने अर्जदार श्री. में. मॉटीफकॉस ईफ्रां बिल्ड तर्फे श्रीहरी श्रीराम आदमने रा. ३७, कादंगीनी विहार बेसा नागपूर जि. नागपुर तारखेवर हजर प्रकरणात सदर भुखंड क्रंमांक ए – १० क्षेत्रफळ ३४०० चौरस फुट (३१५.९८ चौरस मिटर) नामे रामदास लक्ष्मण कावळे यांनी कडुन दस्त क्रं. ४०९६ दिनांक २४.०९.२०१५ रोजी विकत घेतला असल्याचे यांनी आपले लेखी बयानामध्ये म्हणने सादर केले आहे.

तसेच श्री. रामदास लक्ष्मण कावळे रा. प्लॉट नं. १० बैक कॉलोनी, भगवाण नगर, नागपूर यांनी सदर भुखंड क्रं. ए – १०, क्षेत्रफळ ३४०० चौरस फुट (३१५.९८ चौ.मी.) हा भुखंड नामे श्री. नामदेव सदु सोनवने यांचे कडुन दस्त क्रं. ७५०५ दिनांक ०५ सप्टेंबर २०१३ रोजी विक्रीपत्रानुसार खरेदी केला असल्याचे दिसते. परंतु सदर भुखंड हा श्री. रामदास लक्ष्मण कावळे यांचे कडुन अर्जदार नामे श्री. में. मॉटीफकॉस ईफ्रां बिल्ड तर्फे श्रीहरी श्रीराम आदमने रा. ३७, कादंगीनी विहार बेसा नागपूर जि. नागपुर यांनी सदर भुखंड क्रंमांक ए – १० क्षेत्रफळ ३४०० चौरस फुट (३१५.९८ चौरस मिटर) नामे रामदास लक्ष्मण कावळे यांचे कडुन दस्त क्रं. ४०९६ दिनांक २४.०९.२०१५ रोजी विकत घेतला असल्यामुळे अर्जदार यांचे नावे करण्यात यावे.